**L. A. BILL No. XXIII OF 2021.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २३ सप्टेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

१९५९ चा महा. ३.
१९६२ चा महा. ५.
२०२१ चा महा. अध्या. ३.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## **प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, २३ सप्टेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

## **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा.

१९५९ चा ३.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "ग्रामपंचायत अधिनियम" असा केलेला आहे) याच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायतीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अशा जागा, पंचायतीमधील वेगवेगळ्या प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रांचा समावेश असणाऱ्या पंचायतीमध्ये, अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती यांच्याकरिता जागा राखून ठेवल्यानंतर, उर्वरित जागा, कोणत्याही असल्यास, नागरिकांच्या मागास वर्गाच्या व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात येतील :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये येणाऱ्या पंचायतीमध्ये नागरिकांच्या मागास वर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण, या खंडाच्या तरतुदींनुसार असेल :

परंतु तसेच, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**३.** ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (४) मधील, खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची सरपंचांची पदे, पंचायतींमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, संबंधित जिल्ह्यातील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या पदांच्या एक-द्वितीयांश पदे, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;".

प्रकरण तीन

## महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.

१९६२ चा महा. ५.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम " असा केलेला आहे) याच्या कलम १२ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (क) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, जिल्हा परिषदेमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, जिल्हा परिषदेमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अशा जागा, जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या निर्वाचक गटांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रांचा समावेश असणाऱ्या जिल्हा परिषदेमध्ये, अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती यांच्याकरिता जागा राखून ठेवल्यानंतर, उर्वरित जागा, कोणत्याही असल्यास, नागरिकांच्या मागास वर्गाच्या व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात येतील :

परंतु, आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये येणाऱ्या जिल्हा परिषदेमध्ये नागरिकांच्या मागास वर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण, या खंडाच्या तरतुदींनुसार असेल :

परंतु तसेच, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**५.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम याच्या कलम ४२ मध्ये, पोट-कलम (४) मधील, खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ब) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची अध्यक्षांची पदे, जिल्हा परिषदांमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, राज्यातील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या पदांच्या संख्येच्या एक-द्वितीयांश पदे, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

**६.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये, पोट-कलम (१ब) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (क) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायत समितीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, पंचायत समितीतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अशा जागा, पंचायत समितीमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रांचा समावेश असणाऱ्या पंचायत समितीमध्ये, अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती यांच्याकरिता जागा राखून ठेवल्यानंतर, उर्वरित जागा, कोणत्याही असल्यास, नागरिकांच्या मागास वर्गाच्या व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात येतील :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या पंचायत समितीमध्ये नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण, या खंडाच्या तरतुदींनुसार असेल :

परंतु तसेच, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

**७.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम याच्या कलम ६७ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ब) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची सभापतीची पदे, पंचायत समितीमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, राज्यातील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या पदांच्या एक-द्वितीयांश पदे, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.".

## प्रकरण चार

## **संकीर्ण**

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

**८.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

२०२१ चा महा. अध्या. ३.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

१९५९ चा महा. ३.
१९६२ चा महा. ५.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा ३) याचे कलम १०(२)(क) व कलम ३०(४)(ब) आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याचे कलम १२(२)(क), कलम ४२(४)(ब), कलम ५८(१ब)(क) व कलम ६७(५)(ब) यांमध्ये, अनुक्रमे ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती यांमध्ये नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागा राखून ठेवण्यासाठी तरतूद आहे. उक्त अधिनियमांमध्ये, ग्रामपंचायती व जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांमध्ये नागरिकांच्या मागास वर्गासाठी निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के इतक्या आरक्षणाची तरतूद होती.

२. राज्य निवडणूक आयोगाने, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास वर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्तींसाठी आरक्षणाची तरतूद करण्यासाठी दिनांक २७ जुलै, २०१८ व दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या अधिसूचना व इतर अधिसूचना काढल्या होत्या, आणि त्यानुसार, राज्य निवडणूक आयोगाने, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेतलेल्या आहेत.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १२(२)(क) याच्या तरतुदी आणि राज्य निवडणूक आयोगाने, वाशिम, अकोला, नागपूर व भंडारा या जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्याबाबतीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणाची तरतूद करणाऱ्या, दिनांक २७ जुलै, २०१८ व दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी काढलेल्या अधिसूचनांविरोधात **विकास किसनराव गवळी विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर [रिट याचिका (दिवाणी) क्रमांक २०१९ ची ९८०]** यामध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

सर्वोच्च न्यायालयाने, त्याच्या दिनांक ४ मार्च, २०२१ च्या आदेशान्वये, उक्त अधिसूचना, अवैध व कायद्याच्या दृष्टीने अस्तित्वात नसणाऱ्या, इतर मागास वर्गाच्या जागांच्या आरक्षणासाठी तरतूद करतात त्या मर्यादेपर्यंत, त्या अधिसूचना रद्दबातल केल्या आहेत आणि या निर्णयामुळे रिक्त झालेल्या जागा, त्याबाबतीत अधिसूचना काढून, संबंधित स्थानिक संस्थेच्या उर्वरित मुदतीसाठी सर्वसाधारण/खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांमधून राज्य निवडणूक आयोगाकडून तात्काळ भराव्यात असा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने असाही निर्णय दिला आहे की, संबंधित स्थानिक संस्थामधील इतर मागास वर्गाच्या बाबतीतील आरक्षण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास वर्ग यांच्यासाठी एकत्रितपणे राखून ठेवलेल्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या मर्यादेपर्यंत अधिसूचित करता येऊ शकेल.

४. उक्त न्यायनिर्णयाच्या परिच्छेद १२ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, इतर मागास वर्गासाठी स्थानिक संस्थांमध्ये जागा राखून ठेवण्यापूर्वी राज्याने, पुढीलप्रमाणे तिहेरी चाचणीचे/शर्तींचे अनुपालन करण्याची आवश्यकता आहे :— (१) राज्यामधील स्थानिक संस्थांनिहाय मागासलेपणाचे स्वरूप व परिणाम यांची समकालीन सखोल चौकशी करण्यासाठी समर्पित आयोग स्थापन करणे, (२) आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन, स्थानिक संस्थानिहाय तरतूद करण्याची आवश्यकता असलेल्या आरक्षणाचे प्रमाण विनिर्दिष्ट करणे, जेणेकरून, मोठ्या प्रमाणात चूक होणार नाही ; आणि (३) कोणत्याही परिस्थितीत, असे आरक्षण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास वर्ग यांच्यासाठी एकत्रितपणे राखून ठेवलेल्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

उक्त न्यायनिर्णयानुसार, शासनाने, उक्त काम, महाराष्ट्र राज्य मागास वर्ग आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा महा. ३४) अन्वये घटित केलेल्या महाराष्ट्र राज्य मागास वर्ग आयोगाकडे सोपवलेले आहे. आयोगाला, उक्त प्रयोजनासाठी समकालीन सखोल चौकशी करण्याकरिता वाजवी वेळ लागेल.

५. उक्त न्यायनिर्णयामधील परिच्छेद २८ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, १९६१ च्या अधिनियमाच्या कलम १२(२)(क) च्या वैधतेला दिलेले आव्हान निरर्थक ठरले आहे. त्याऐवजी, ती तरतूद या अर्थाने वाचण्यात यावी की, संबंधित स्थानिक संस्थांमधील इतर मागास वर्गाच्या बाबतीतील आरक्षण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास वर्ग यांच्यासाठी एकत्रितपणे राखून ठेवलेल्या एकूण जागांच्या

५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या मर्यादेपर्यंत अधिसूचित करता येतील. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, या न्यायालयाच्या घटनापीठाने प्रतिपादन केल्याप्रमाणे, कलम १२(२)(क) मध्ये येणाऱ्या २७ टक्क्यांइतक्या "असतील" या संज्ञेचा अन्वयार्थ, "असू शकतील" असा लावण्यात येईल आणि त्यात, एकत्रितपणे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास वर्ग यांच्या एकूण ५० टक्क्यांच्या बाह्यमर्यादेस अधीन राहून, इतर मागास वर्गाचे आरक्षण २७ टक्क्यांपर्यंत असू शकेल अशा अर्थाचा अंतर्भाव असेल.

६. उक्त न्यायनिर्णय लक्षात घेता, इतर मागास वर्गास स्थानिक संस्थांमध्ये आरक्षण राहिलेले नाही. स्थानिक संस्थांमध्ये, इतर मागास वर्गांना प्रतिनिधित्व देण्याकरिता, शासनाने, दरम्यानचा उपाय म्हणून, ग्राम पंचायतींमध्ये, पंचायत समित्यांमध्ये व जिल्हा परिषदांमध्ये नागरिकांच्या मागास वर्गांच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागांच्या २७ टक्क्यांपर्यंत आरक्षणाची तरतूद करण्याचे, आणि एकूण आरक्षण, स्थानिक संस्थांमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद करण्याचे ठरविलेले होते. म्हणून, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०(२)(क) व कलम ३०(४)(ब) यांमध्ये आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १२(२)(क), कलम ४२(४)(ब), कलम ५८(१ब)(क) व कलम ६७(५)(ब) यांमध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

७. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २३ सप्टेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. ३), प्रख्यापित केला होता.

८. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **हसन मुश्रीफ,**

दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१. ग्रामविकास मंत्री.

## सन २०२१ चे वि. स. विधेयक क्रमांक २३—महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

### (महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यातील उतारे)

### (सन १९५९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)

**१. ते ९.** ** ** **

**१०.** (१) ** ** ** पंचायती घटित करणे.

(१अ) ** ** **

(२) (अ) आणि (ब) ** ** **

(क) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायतीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांइतक्या असतील आणि अशा जागा पंचायतीमधील वेगवेगळ्या प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायतीमध्ये नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा, अनुसूचित जनजाती आणि अनुसूचित जाती यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर राहिलेल्या, कोणत्याही असल्यास, जागांच्या २७ टक्के इतक्या असतील :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये असलेल्या पंचायतीमधील नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण, खंड (क) च्या तरतुदींनुसार असेल :

परंतु तसेच, अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा नागरिकांच्या मागासवर्गांच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ड) ** ** **

(२अ) ते (४) ** ** **

(१०-१अ) ते (१०-अ) ** ** **

**११.** ते **२९.** ** ** **

**३०.** (१) ते (३) ** ** ** सरपंचाची निवडणूक.

(४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी पंचायतीच्या सरपंचाच्या पदांमध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा असतील :—

(अ) ** ** **

(ब) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची सरपंचांची पदे, पंचायतींमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के एवढी असतील :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या पदांपैकी एक-द्वितीयांश पदे नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(क) ** ** **

(५) आणि (६) ** ** **

**३०अ-१अ.** ते **३०अ-१ब.** ** ** **

**३०-१(अ).** ** ** **

**३०अ.** ** ** **

**३१.** ते **१८८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

## (महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम यातील उतारे)

## (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५)

**१. ते ११.** ** ** **

जिल्ह्याची निवडणूक विभागात विभागणी.

**१२.** (१) ** ** **

(२) (अ) आणि (ब) ** ** **

(क) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, जिल्हा परिषदेमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांइतक्या असतील आणि अशा जागा जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या निवडणूक विभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा, अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर राहिलेल्या, (कोणत्याही असल्यास) जागांच्या २७ टक्के इतक्या असतील :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये असलेल्या जिल्हा परिषदेमधील नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण, खंड (क) च्या तरतुदींनुसार असेल :

परंतु तसेच, अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ड) ** ** **

(३) ** ** **

**१२अ.** ** ** **

**१३.** ते **४१.** ** ** **

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक.

**४२.** (१) ते (३) ** ** **

(४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या पदांमध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा असतील :—

(अ) ** ** **

(ब) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची अध्यक्षांची पदे, जिल्हा परिषदांमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के एवढी असतील :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या संख्येच्या एक-द्वितीयांश पदे नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(क) ** ** **

(५) वगळण्यात आले.

(६) आणि (६अ) ** ** **

(७) ** ** **

**४३.** ते **५७.** ** ** **

निर्वाचक गण, निरर्हता, निवडणुका व निवडणूक विषयक विवाद यांच्या संबंधातील तरतुदी.

**५८.** (१) आणि (१अ) ** ** **

(१ब) (अ) आणि (ब) ** ** **

(क) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायत समितीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांइतक्या असतील आणि अशा जागा पंचायत समितीमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्र समाविष्ट असलेल्या पंचायत समितीमध्ये अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती यांच्याकरिता जागा राखून ठेवल्यानंतर उर्वरित जागांपैकी (कोणत्याही असल्यास) २७ टक्के जागा ह्या नागरिकांच्या मागासवर्गाच्या व्यक्तींकरिता राखून ठेवण्यात येतील :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या पंचायत समितीमध्ये नागरिकांच्या मागासवर्गाच्या व्यक्तींकरिता राखून ठेवावयाच्या जागा ह्या खंड (क) च्या तरतुदींनुसार असतील :

परंतु, तसेच अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ड) ** ** **

**५८अ.** ** ** **

**५९. ते ६६.** ** ** **

**६७.** (१) ते (४) ** ** **

(५) पंचायत समित्यांमधील सभापतींच्या पदांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्ती व स्त्रिया यांच्यासाठी पुढीलप्रमाणे आरक्षण करण्यात येईल :— पंचायत समितीच्या सभापतीच्या निवडणुकीची कार्यपद्धती.

(अ) ** ** **

(ब) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची सभापतीची पदे पंचायत समित्यांमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के इतकी असतील :

परंतु, अशा रीतीने राखून ठेवलेल्या पदांच्या एक-द्वितीयांश पदे नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(क) ** ** **

(६) वगळण्यात आले.

(७) आणि (७अ) ** ** **

(८) ** ** **

**६८.** ते **२९०.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.]**

**[महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. हसन मुश्रीफ,**
ग्रामविकास मंत्री.]

[ **विधानसभेने दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई